**दिनांक १५/०१/२०२४**

## अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १४/०१/२०२४ चे ००.०१ ते २४.०० वा.

### खुन

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे सिटी कोतवाली अम शहर अप क्र १५/२४ कलम ३०२ भादवि | सबनिस वाडा , रेल्वेस्टेशन समोर अमरावती | दिनांक ०९/०१/२०२४ चे २१.४५ वा दाखल वेळ दिनांक १४/०१/२०२४ चे २२.१९ वा | शुभम नरलेश पवार, वय २७, धंदा खाजगी नोकरी, रा राजुरा पारधझी बेडा, ह मु, विश्रांतवाडी एयरवाडा जेल जवळ पुणे, | अरून टिल्लु सोळंके , वय ४२, रा. राजुरा पारधी बेडा, अम | हकीकत अशा प्रकारे आहे की दि. ७/०१/२४ रोजी माझा मामा अरून हा माझे घरी गेला होता व माझा भाऊ जिथे भेटेल तिथे त्याचे तुकडे करून फेकुन देईल अशी माझे आई वडीलांना घमकी दिली होती. दि. ०९/०१/२४ रोजी दुपारी अंदाोजे ०४.०० वा सुमारास माझा लहान भावाने माझ्या आइला त्याचे बुट व कपडे धुवुन ठेवण्यास सांगितले होते तो दुसर्या दिवशी ते घुतलेले कपडे घालनार होता. आई ला सांगुन तो मोपेड गाडी घेवुन तो घरून निघुन गेला तो गेल्यानंतर दोन तिन दिवस घरी आला नाही त्याचे फोन वर फोन केला तर त्याचा फोन लागत नोव्हता मी पुणे येथे असल्याने माझे वडीलांना व आई ला पो. स्टे फ्रेजरपुरा ला भावा बाबत रिपोर्ट देण्यास सांगितले होते त्यांनीा दि. १२/०१/२०२४ रोजी माझ्या भावाची मिसींग रिपोर्ट पो. स्टे फ्रेजरपुरा ला दिली आहे माझा भाउ घरी आला नसल्याने माझ्या आई वडीलांनी मला सांगितले की तो घरून जाने अगोदर माझे मामा ने त्याला मारून टाकण्याची धमकी दिली होती . दि. १२/०१/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा सुमारास मैलेश चौव्हान याला पोलीसचा फोन आला व त्यनो सांगितले की रेल्वे स्टेशन च्या समोर एका बंद वाड्याच्या जागेत एक मृत देह सापडला असुन त्याची ओळख पटविण्यासाठी इरविन ,हॉस्पीटल येथे सांगितले. त्यानंतर मैलेश चोव्हान व माझे भाउजी रवि भोसले हे इरविन हॉस्पीटल येथे गेले इरविन हॉस्पिटलच्या मर्च्युरिमध्ये एक मृत देह ठेवलेला होता . त्याचे कपडे वरून व शरिर बांधेवरून तो माझा लहान भाउ सवगेश असल्याचे त्यांनी ओळखले त्यानंतर पोलीसांनी मला गजानन महाराज मदिर मर्च्युरि रोड अम येथील दि. ०९/०१/२४ रोजी चे रात्री ९.४५ वा चे दरम्यान चे सिसिटीव्ही फुटेज दाखविले त्यामध्ये माझा मामा अरून हा माझ्या भावाच्या मागे पळत असतांना दि्सत आहे तसेच त्याचे थोड्यावेळाने मामा एकटाच परत जातच असतांना दिसतो . त्यानंतर दि. १२/०१/२४ रोजी माझ्या भावाचा मृतदेह किळे पडलेल्या स्थितत मिळाला. माझे मामाने माझ्या भावाचा पाटलाग करून माझा भाउ सवगेश हा एक महीला सोबत बोलत असल्याचा व तिचट्या सोबत अनैतिक संबंध ठेवत असल्याच्या रागावरून माझ्या भावाचा पाठलाग करून सबनीस वाडा रेल्वे स्टेशन समोर अम. येथे दि. ०९/०१/२४ रोजी रात्री ०९.०० ते ९.४५ च्या दरम्यान जिवाने मारून टाकलेले आहे त्यामुळे माझे मामा अरून टिल्लु सोळंके याचे विरूद्ध कायदेशिर कारवाई होण्यासाठी ,रिपोर्ट देत आहे अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

# दुखापत

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ३६/२०२४ कलम ३२४,३२३, ५०४,५०६, ३४ भादवी | किशोर इंजिनिअरिंग वर्कशॉप समोर चिचफैल अमरावती | घटना ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ रोजी १४/३० वा. ते दाखल ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ चे १७/५३ वा. | प्रितम किशोर शिवणकर वय ३८ वर्ष रा चिचफैल गल्ली नं २ अमरावती | नरेश सोळंके ,आकाश सोळंके ,आकाशचा मामा व एक अनोळखी व्यक्ती सर्व रा विलास नगर अमरावती | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी व आरोपी क्र १ यांचे दुकान एकमेकांचे दुकानाला लागुन असुन आरोपीच्या दुकानाच्या ओट्यावरील पाणी फिर्यादीच्या दुकानासमोर आल्यामुळे फिर्यादीने आरोपीला पाणी माझ्या दुकानाच्या समोर का येत आहे त्याचे काहीतरी पहा असे म्हटले असता तु माझ्या मुलासोबत बोल असे म्हणुन आरोपीने फोन करुन इतर आरोपींना बोलविले व सर्वांनी संगणमत करुन फिर्यादीला लोखंडी पाईपने त्याचे डाव्या पायावर मानेजवळ डाव्या बाजुला मारहान करुन जखमीकेले व फि चे काकाला बुक्यांनी मारहान करुन फि चे पत्निला शिविगाळ करुन मारण्याची धमकी दिली अशा फर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन ा व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ३७/२०२४ कलम ३२४,३२३, ३४ भादवी | किशोर इंजिनिअरिंग वर्कशॉप समोर चिचफैल अमरावती | घटना ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ रोजी १५/३० वा. त १६/०० वा दरम्यान दाखल ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ चे १८/५० वा. | चेतन मनोज सुर्यवंशी वय २२ वर्ष रा विलास नगर लोहार लाईन अमरवाती | तिन ते चार अनोळखी इसम | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हा त्याचे मामाचे दुकानावर लोखंडीपाईप आणण्याकरीता त्याचे मित्रा सोबत मामाच्या मुलाच्या गाडीवर गेला असता त्याठिकाणी फिर्यादीच्या मामाच्या दुकानाशेजारी असणा-या दुकानासमोर त्याच दुकान मालकासोबत मामा व काका यांची भानगड सुरु होती फिर्यादीने त्याच्या मामाच्या दुकानातुन लोखंडी पाईप सोबत घेवुन त्याचे मित्रा सोबत जात परत जात असतांना त्याठिकाणी असलेल्या अनोळखी तिन ते चार मुलांनी फिर्यादीला गाडीवरुन ओढुन खाली पाडले तेव्हा फिर्यादीचा मित्र गाडी घेवुन पळुन गेला नमुर नमुद आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीला लाथा बुक्यांनी मारहान करीत असतांना मारहान करणा-यापैकी पिवळ्या रंगाचे चेक्स चे शर्ट घातलेल्या अनोळखी मुलाने त्याचे जवळील चाकु फिर्यादीला मारत असतांना फिर्यादीने तो उजव्या हातात पकडल्याने फिर्यादीच्या उजव्या हाताला जखम झाली अशा फर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## विनयभंग

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ३८/२०२४ कलम ३५४,३२४, ५०४, ५०६,३४ भादवी | अमरावती | घटना ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ रोजी २०/३० वा. दाखल ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ चे २३/०७ वा. | एक महीला | अनुप खंडारे , अक्षय खंडारे दोन्ही रा अमरावती | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठिकाणी नमुद आरोपीतांनी फि चे घरी येवुन फि चे नातेवाईकाला मारहान करुन शिविगाळ केली व फि स हातांना व शरीराला लज्जास्पद वाटेल असा स्पर्श करुन विनयभंग केला व जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या.अशा फर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन दरचा गुन्हा दाखल |

## पळवून नेणे

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे फ्रेजरपुरा अप. न. ३७/२०२४ क. ३६३ भा दवि. | अमरावती | घटना ता वे ळ - दि. १४/०१/२०२४ चे ०९/४५ वा. पासुन ते आता पावेतो दरम्याण दाखल ता वेळ -दि. १४/०१/२०२४ चे २१/३३ वा. | एक महीला | अज्ञात इसम | हकीकत अश्या प्रकारे आहे की दि. १४/०४/२०२४ रोजी सकाळी १९/४५ वा दरम्याण फिची नातेवाईक चर्चच्या कार्यक्रमातुन जावुन येते असे म्हणुन ती घरुन निघुन गेली. त्यानंत फिला दुपारी ०२/०० वा. दरम्याण चर्चम धील कार्यक्रम संपल्याचे समजले. परंतु फि ची नातेवाईक ही घरी परत आली नाही. त्यामुळे फि ही तीची नातेवाईक हीला बघायला गेले असता व तिचा अद्दाप पावेतो शोध घेतला अशता ती मिळुन आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे. अश्या फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

# घरफोडी

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. नांदगांवपेठ अप क्र. १४/२०२४ कलम ४५७, ३८० भादवी | बिझिलॅंड मधील L४,L५ मधील माझे दुकान | १३/०१/२०२४ चे २०.०० वा ते १४/०१/२०२४ चे ११.०० वा परंत दाखल १४/०१/२०२४ चे १८.४९ वा | रवि पुरणचंद खेमचंदाणी वय ४२ रा. सिधिकॅप अमरावती | अज्ञात | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फि. हे L५ मध्ये साई कृष्णा नावाचे दुकान आहे ते रोज सकाळी ११.०० वा दुकान उघडतात व रात्री ०८.०० वा बंद करतात दि. १३/ ०१/२०२४ रोजी नियमित प्रमाणे दुकान बंद करुन घरी गेले दुकान बंद करते वेळी दुकानात कौंटर मध्ये ७०००/- होते दि. १४/ ०१/२०२४ रोजी ११.०० वा फोन आला की तुमचे दुकानाचे शेटर वाकलेले आहे असा फोन आल्यावर मी घटनास्थळी गेलो व मी दुकानात प्रवेश केला पाहणी केली असता दुकानाच्या ड्राव्हर मध्ये ठेवलेले ७०००/- दिसुन आले नाही व माझ्या बाजुला असलेले दुकान १) प्रकाश गोविंद आनंदराव यांचे व्यंकटेश ट्रेडर्स यांनी सांगीतले की माझे पण दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन ड्राव्हर मधील ८५००/- घेवुन गेला तसेच २) हरीष अमरलाल कर्वा यांचे राज टिलक एन.एक्स ह्या यांनी माझे पण दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन ड्राव्हर मधील १००००/- घेवुन गेला ३) शाम प्रर्व कॉस्मेटीक अक्षय सुभाष गवई यांचे पण दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन ड्राव्हर मधील २०००/- घेवुन गेला ४) महाराणी लेडीज वेअर चे मालक जय राकेश गगवानी यांचे पण दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन ड्राव्हर मधील २५०००/- घेवुन गेला ५) सुनिल जयरप्रकाश लालवाणी यांचे पण दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन ड्राव्हर मधील २५०००/- घेवुन गेला तरी कोणीतरी अज्ञात चोराने बिझिलॅंड मधील L४,L५ मधील दुकानाचे शटर वाकवुन आत प्रवेश करुन एकुन ६३५००/- चा नगदी माल चोराने चोरुन नेला अशा फि. यांच्या जबानी रिपोर्ट वरुन गुन्हा दाखल |
| ०२ | पो. स्टे. राजापेठ अप क्र. ३५/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी | प्लॉट नं. ०४ गजानन नगर मेहरबाबा कॉलनी छत्री तलाव रोड अमरावती शहर | घटना ता.वेळ व ठिकाण - दि. १२/०१/२०२४ रोजी १८/०० वा. ते दि. १३/०१/२०२४ चे १०.०० वा. दरम्यान<br><br>दाखल ता.वेळ व ठिकाण - दि. १४/०१/२०२४ चे ०१.०८ वा. | अमरा सागर अशोकराव शाहाकार वय ४० वर्ष व्यवसाय - अॅडव्होकेट रा. प्लॉट नं. ०४ गजानन नगर मेहरबाबा कॉलनी छत्री तलाव रोड अमरावती शहर | अज्ञात इसम | गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी हे दि. ०५/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता पुणे येथे परिवारासह लहाण भाउ आकाश यांचे कडे गेलो होतो आज दि. १३/०१/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता मला माझे चुलत भाउ अक्षय शाहाकार यांचा फोन आला की, तुझे घर काल दि. १२/०१/२०२४ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजता बंद असल्याचे मी पाहीले परंतु आता तुझे घर उघडे असुन दावाजाच्या कडी तोडलेली आहे व पोलीसांना सांगितले. त्यावरुन मी तात्काळ पुणे येथुन परिवारासह निघुन रात्री ९.३० वा. पोहचलो असता मी पोलीसा समक्ष घराची पाहणी केली असता घराचे मुख्य दरवाजा कोंढा तोडलेला दिसला. तसेच आतमधील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले. घराच्या वरच्या मजल्यातील रुममधील कपाटाचा दरवाजा तोडुन त्यामधील सामान बाहेर टाकेलेले होते. कपाटमध्ये पाहणी केली असता त्यामध्ये ठेवलेले १. सोन्याचे मंगळसुत्र अंदाजे वजन १७.०० ग्रॅम, अंदाजे किंमत ७०,००० रुपये २.सोन्याचे कानातील गोल्ड लटकन वजन ०४.०० ग्रॅम अंदाजे किंमत २४००० रुपये ३. सोन्याची गळयातील चेन वजन १० ग्रॅम ५०००० रुपये ४. सोन्याचे नथ वजन ००.९०० ग्रॅम अंदाजे किंमत २००० रुपये ५. सोन्याचे मनी वजन अर्धा ग्रॅम अं.किं. २००० रुपये ६. चांदीच्या वाटया ०२ नग वजन गॅम माहित नाही अं.किं. ६००० रुपये ७. चांदीचे पैजन वजन २० ग्रॅम अं.किं. ८००० रुपये , चांदीचे जोडवे वजन ५ ग्रॅम अं.किं. ५००० रुपये असे एकुण अं.किं. १,६४,००० रुपये चा माल अज्ञात इसमाने चोरुन नेला करीता रिपोर्ट देत आहे. अशा फर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## अपघात

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोलीस स्टेसन गाडगेनगर अमरावती अपक्र ६७/२४ कलम- २७९, ३३७, ३३८ भादवी | राघास्वामी संत्सग गेट समोर अमरावती | गु.घटना ता व वेळ दि.१३.१.२० २४ चे १९.३० वा माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ दि १४.१.२०२ ४ चे २३.३३ वा | सिध्दात मोहनराव ताडे वय- २१ रा. गजानन नगर बिच्चु टेकडी अमरावती | एम एच २७ सी एच ६६६५<br><br>१. गोपाल रिठे<br>२. प्रविण सावरकर दोन्हा रा. रेवसा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी हे त्याच्या ताब्यातील टु व्हीलर ने घरी जात असताना त्याच्या समोरुन नमुद वाहन् क्रमांकाच्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजी पणामे व बेदरकारपणाने चालुन धडक दिली त्यामुळे फिर्यादी व त्याचे मित्र हे जख्मी झाले त्याना दवाखान्यात भर्ति करण्यात आले तसेचफिर्यादी च्या बयाना वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला . .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती अपक्र.६६/२४ कलम- १८८ भादवी सहकलम ५/१५ पर्यावरण संरक्षण अधिनीयम १९८६ प्रमाणे | महात्मा फुले नगर नवसारी _अमरावती | गु.घटना ता व वेळ दि. १४.१.२०२४ चे ११.४५ वा माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ दि. १४.१.२०२४ चे १९.४२ वा | सर.तर्फे पोउपनी गणेश राउत पोस्टे गाडगेनगर अमरावती | मोहन श्रीरामजी ठाकरे वय-४८ रा. नवसारी अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातीन फिर्यादी याची पेट्रोलींग ड्युटी असताना त्याना गृप्त दारा कडुन खात्री लायक बातमी मिळाली की, नमुद ठिकानी एक इसम हा नांयलान चा मांजा विक्री करीत आहे फिर्यादी यानी पोस्टेचे स्टाफ सह नमुद ठिकानी गेले असता नमुद आरोपी हा मांजा विक्री करीत असताना मिळुन आला मा पोलीस आयुक्त साहेब याच्या आदेश क्र पोआअ/१४४जाफौ /४९००६/२३दि. २८.१.२३ चे अनुसार नॉयलान माजा वक्री करणे किंवा जवळ बाळगणे सक्त मनाई असुन सुध्दा नायालान माजा ची विक्री करीताना नमुद आरोपी मिळुन आल्याने नमुद आरोपीस पंचासमक्ष वरिल कलमा नुसार कायदेशीर कार्यावाही करण्यात आली. मिळालेल्या माला चे वर्णनइ १.मध्यम आकारची चक्री १५ नग किअ. ७५००/-रु,२. अरबाब ब्राड असलेला ०३ नग कि.अ. ३०००/-रु,३. ग्लीडर कम्पनीचे ०४ नग कि.अ. ४०००/- रु,४. हिरोकम्पनीचा मांजा १० नग कि.अ. ८०००/-रु ५. मोनो काईटस मांजा ०५ नग कि.अ.४०००/- रु,६. लेबलफाटलेला मांजा ०९ कि.अ.४५००/-रु ७. बिना ब्रडचा मांज०४ कि.अ. २०००/- रु ,एकुन ३३०००/- रु चा माल जप्त करण्यात आला . .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## प्रोव्हीशन रेड

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोलीस स्टेशन गाडगेनगर अमरावती | अपक्र. ६५/२४ कलम- ६५ ई मदाका | सिध्दार्थ नवसारी अमारावती | दि. १४.१.२०२४ चे १२.३० वा | दि.१४. १.२०२४ चे १७.०६ वा | पोहेका सुभाष पाटील बन १२८० पोस्टे गाडगेनगर अमरावती | प्रकाश बाळु राठोड वय-३५ रा. आंबेडकर पुतळ्या जवळ सिध्दार्थ नवसारी अमारावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी ठिकानी यातील फिर्यादी याची पोस्टेसा रेड करणे कामी ड्युटी असताना त्याना गृप्त्दारा कडुन खात्री लायक बातमी मिळाली की, नमुद घतावेळी एक इसम हा दारु विकत आहे , पोस्टेचे स्टॉफ सह नमुद ठिकानी फिर्यादी हे गेले असता त्याना नमुद इसम हा दारु विक्री करीताना दिसुन आला नममद आरोपीस पंचासमक्ष नाव पत्ता विचारले असता वरिल प्रमाणे ना सांगीतले व पंचासमक्ष १.देशी दारु बाँबी संत्रा. ९० एम एल च्या ५० नग काचेच्या बाँटल कि.अ. २५००/- रु २. देशी दारु टँगो पंच ९. एम एल च्या ५० नग प्लास्टिक बाँटल कि.अ. २५००/- रु चा असा एकुन ५०००/- रु चा माल पचा समक्ष जप्त करण्यात आला .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |